ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 8 ]
Total No. of Printed Pages : 8 ]
ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 47 ]
Total No. of Questions : 47 ]

**B**

**CCE RR**
**UNREVISED**

Question Paper Serial No. **61**

येथून कापा.

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 85-M**

**Code No. : 85-M**

# ವಿಷಯ : ಸಮಾಜ ವಿಜ್ಞಾನ

# Subject : SOCIAL SCIENCE

**( ಮರಾಠಿ ಭಾಷಾಂತರ / Marathi Version )**

**( ಹಳೆ ಪಠ್ಯಕ್ರಮ / Old Syllabus )**

**( ಪುನರಾವರ್ತಿತ ಶಾಲಾ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Regular Repeater )**

ದಿನಾಂಕ : 09. 04. 2020 ] [ Date : 09. 04. 2020

ಸಮಯ : ಬೆಳಗ್ಗೆ 9-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 12-45 ರವರೆಗೆ ] [ Time : 9-30 A.M. to 12-45 P.M.

ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 80 ] [ Max. Marks : 80

**TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER**
**प्रश्न पत्रिका येथून कापून उघडा.**

**विद्यार्थ्यांना सामान्य सुचना :**

1. प्रश्न पत्रिकेमध्ये बहुपर्यायी आणि वस्तूनिष्ठ प्रकारचे 47 प्रश्न आहेत.
2. प्रश्न पत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परीक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती उघडावयाची आहे. प्रश्न पत्रिकेमधील सर्व प्रश्न व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पाहा.
3. बहूपर्यायी आणि वस्तुनिष्ठ या दोन्ही प्रकारच्या प्रश्नांसाठी दिलेल्या सुचनांचे पालन करा.
4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.
5. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्न पत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटेही दिलेली आहेत.

Tear here

I. **खालील प्रत्येक प्रश्नाला किंवा अपूर्ण वाक्यांशाला चार बहुपर्यायी उत्तरे दिलेली आहेत. त्यापैकी एक पर्याय बरोबर आहे. बरोबर असलेला पर्याय निवडून त्याच्या इंग्रजी मुळाक्षरासह पूर्ण उत्तर दिलेल्या उत्तर पत्रिकेमध्ये लिहा :** 10 × 1 = 10

1. भारताचे पोलादी पुरुष

   (A) महात्मा गांधी

   (B) डॉ० बी० आर० आंबेडकर

   (C) सरदार वल्लभभाई पटेल

   (D) जवाहरलाल नेहरू.

2. स्वातंत्र्यानंतरही पोर्तूगीजांची वसाहत असलेल्या प्रांताचे नाव

   (A) पाँडेचेरी (B) गोवा

   (C) कारकळ (D) माहे.

3. भारत आणि श्रिलंकेचे नातेसंबंध ऐतिहासिक आहेत. असे स्पष्टीकरण हे विधान करते.

   (A) भारताचा श्रीलंकेशी उत्तम व्यापारी संबंध आहे

   (B) एल. टी. टी. ई. च्या विरोधात भारताने सैन्य दिले

   (C) भारतीय बौद्ध भिक्षूनी श्रीलंकेत बोध धर्माचा प्रसार केला

   (D) भारताने श्रीलंकेशी आर्थिक बरोबर राजकिय क्षेत्रात सुसंबंध निर्माण केले आहेत.

4. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या ( UNO ) सचिवाची कार्यालयीन मुदत ही

(A) 3 वर्ष (B) 4 वर्ष

(C) 5 वर्ष (D) 6 वर्ष.

5. सामाजिक ऐक्यासाठी सहाय्यक असणारा घटक हा आहे.

(A) जातीयवाद

(B) वर्णभेद निती

(C) जातीयता

(D) शिक्षण.

6. परतीच्या मोसमाला ( ऋतू ) मान्सूनच्या परतीचा मोसम असे सुद्धा म्हणतात कारण –

(A) वातावरणाचा दाब वाढल्याने नैऋत्य मान्सून वारे ऑक्टोबर पासून परत जाण्यास प्रारंभ करतात.

(B) नोव्हेंबरच्या शेवटी वारे वाहण्याचे थांबतात.

(C) ऑक्टोबर महिन्यात भारताच्या उपखंडात पाऊस पडतो आणि उष्णता कमी होते.

(D) दक्षिण ध्रुवावर सुर्याची किरणे लंब पडतात.

7. भारतातील सर्वात मोठी असलेली नदिखोऱ्यातील बहुउद्देशिय योजना ही आहे.

(A) भाक्रा-नानगल (B) कोसी

(C) दामोदर (D) हिराकूड.

8. आर्थिक तूटीचे ( Fiscal deficit ) कारण हे आहे.

(A) निर्गुंतवणूक कर भरल्यास

(B) सरकारला कर्ज भरल्यास

(C) सरकारचा खर्च अधिक झाल्यास

(D) सरकारचे कर्ज जास्त झाल्यास.

9. चालू खाते ( Current Account ) हे व्यावसायिक किंवा उद्योजकाना फार उपयोगाचे आहे. कारण

(A) बँक या खात्यावर कोणतेही व्याज देत नाही.

(B) या खात्यामध्ये कितीही रक्कम ठेवण्यास व काढण्यास मर्यादा आहे.

(C) बँक या खात्यावर सेवा कर गोळा करते.

(D) या खात्यामध्ये दिवसातून कितीही रक्कम कितीही वेळा ठेवली किंवा काढली जावू शकते.

10. जिल्हा औद्योगिक केंद्राचा मुख्य उद्देश –

(A) स्वयम उद्योगाला प्रोत्साहन देणे

(B) शहरी प्रदेशात उद्योगधंदे स्थापन करणे

(C) ग्रामीण प्रदेशात लघुउद्योगाला चालणा देण्यासाठी व्यवस्थापकिय सहकार्य पुरविणे

(D) शहरी उद्योगांचा विकास करणे.

II. **खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा :** 14 × 1 = 14

11. युग म्हणजे काय ?
12. लोकायुक्त स्थापनेचा मुख्य उद्देश काय ?
13. 1909 च्या मोर्ले-मिंटो सुधारणा कायद्याने भारतीयाना विभागले. कसे ?
14. संयुक्त राष्ट्र संघटनेची विश्वस्त समिती आता एक लहान शाखा बनली आहे. का ?
15. धवल क्रांतीचे जनक कोण ?
16. शांत दरी चळवळ का झाली ?
17. नाझी सिद्धांताने जर्मनीचा नाश झाला. कसा ?
18. ''मजूरीहून शाळेला'' या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश कोणता ?
19. भारतात वाढणारी दोन महत्वाची पेयपिकांची नावे सांगा.
20. उत्पन्न वाढविणारी शेती म्हणजे काय ?
21. दगडी कोळसा याला ''काळा हिरा'' असे का म्हणतात ?
22. माहिती तंत्रज्ञान याला ज्ञान आधारित तंत्रज्ञान असे का म्हणतात ?
23. ''महिला सबलीकरणाची'' व्याख्या लिहा.
24. डॉ० स्वामीनाथन याना ''हरित क्रांतीचे जनक'' म्हणतात. का ?

III. **खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी दोन ते चार वाक्यात लिहा :** 15 × 2 = 30

25. तीसऱ्या अँग्लो-म्हैसूर युद्धाचे परिणाम कोणते ?
26. समुद्र प्रवासाला वैज्ञानिक विकास कारण बनले. या वाक्याचे समर्थन करा.
27. अलिगड चळवळीचे मुख्य उद्देश कोणते ?

**किंवा**

रामकृष्ण मिशनचा दृष्टीकोन कोणता ?

28. रशियात लेनिनने हाती घेतलेल्या सुधारणा सांगा.
29. प्रांतियवादाचे वर्णन करा.
30. मातीची धूप होण्याची कारणे कोणती ?

31. जगभरातील मानवी हक्कांचा पाठपुरावा करण्यात भारताच्या भूमिकेचे वर्णन करा.

32. भारताच्या द्विपकल्पीय पठाराचे आर्थिक महत्व सांगा.

33. उदाहरणासहित जमावाचे वर्णन करा.

34. अरण्याचे संरक्षण करण्यासाठी कोणते उपाय हाथी घेतले आहेत ?

35. जी० पी० एस० ( GPS ) एक मार्ग सुचक आहे. कसे ?

36. महापूराचे परिणाम कोणते ?

37. लोकसंख्या वाढीणे आर्थिक विकासावर भयानक परिणाम होतो. कसा ?

38. मानवाची आयुमर्यादा वाढण्यास सहाय्यक असणाप्या घटकांची यादी बनवा.

39. जागतिकीकरण ग्राहकाना जास्त वस्तू निवडण्याची संधी देते. कसे ?

IV. **खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सहा वाक्यात लिहा :** $6 \times 3 = 18$

40. ब्रिटिशानी भारतात शिक्षण क्षेत्रात केलेली सुधारणा ही लक्षणीय होती. कशी ?

**किंवा**

1857 च्या बंडाचा भारतीयावर परिणाम झाला. कसा ?

41. भारताच्या परराष्ट्र धोरणाचे उद्देश सांगा.

**किंवा**

भारताचे रशियाशी असलेल्या नातेसंबंधाचे वर्णन करा.

42. रस्ते वाहतूकीच्या समस्यांचे वर्णन करा.

**किंवा**

उद्योगधंद्याच्या स्थायिकरणावर परिणाम करणारे घटक कोणते ?

43. अस्पृश्यता निमूलनासाठी हाती घेतलेले घटनात्मक आणि कायदेशीर उपाय कोणते ?

**किंवा**

संघटित आणि असंघटित कामगार यांच्यातील फरक कोणता ?

44. ग्रामीण विकासाचे महत्व स्पष्ट करा.

**किंवा**

खासगी अर्थव्यवस्था ( वैयक्तिक ) आणि सार्वजनिक अर्थव्यवस्था यामधील फरक स्पष्ट करा.

45. बँक खाते उघडण्याचे फायदे सांगा.

**किंवा**

विमा कंपन्यांचे फायदे सांगा.

V. **खालील प्रश्नाचे उत्तर आठ ते दहा वाक्यात लिहा :** 4

46. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत सुभाष चंद्र बोस यांच्या योगदानाचे वर्णन करा.

VI. 47. **भारताच्या नकाशाचा आराखडा काढा आणि खालील ठिकाणे दाखवा :** $1 + 3 = 4$

a) $23\frac{1}{2}^{\circ}$ कर्कवृत्त

b) हिराकूड योजना

c) बाँम्बे हाय.

**अंध विद्यार्थ्यांसाठी पर्याय प्रश्न : ( प्रश्न संख्या 47 ऐवजी )**

भारतीयाच्या जिवनात हिमालयाचे महत्व काय ? 4